# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:31.03.2025** **वार:सोमवार**

1. देशाच्या कठीण काळात सामाजिक चळवळींनी राष्ट्रीय चेतना जागृत ठेवली-पंतप्रधानांचं प्रतिपादन; नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या केंद्राचं पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन
2. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गानं नवी कौशल्य शिकावीत-मन की बातमधून पंतप्रधानांचं आवाहन
3. गुढी पाडव्याचा सण राज्यभरात उत्साहात साजरा
4. देशात सर्वत्र आज ईद-उल-फित्रचा उत्साह आणि
5. छत्तीसगडमध्ये 50 माओवाद्यांची पोलिसांसमोर शरणागती

**<u>मोदी नागपूर</u>**

देशासाठी अत्यंत कठीण काळ असतानाही इथल्या नव्या सामाजिक चळवळींनी राष्ट्रीय चेतना जागृत ठेवली, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. गोरगरिबांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. माधव नेत्रालयानेही या कार्यात योगदान देत गेल्या तीन दशकांपासून लोकांच्या जीवनात प्रकाश आणण्याचं कार्य केलं असं मोदी म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारतीय संस्कृती आणि राष्ट्राच्या चेतनेला सातत्याने ऊर्जा देणारा; भारताच्या अमर संस्कृतीचा आधुनिक अक्षयवट आहे. ज्याप्रमाणे संतांनी समाजाला नवी ऊर्जा देण्याचं काम केलं त्याचप्रमाणे डॉ हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांनीही समाजाला ऊर्जा दिली. संघ अंतरदृष्टी आणि बाह्यदृष्टीसाठी काम करणारी संघटना आहे. पूर, भूकंप किंवा कोणत्याही संकटात मदत करण्यासाठी संघाचे स्वयंसेवक तत्पर असतात, आणि ते नेहमीच निस्वार्थीपणे काम करतात असं मोदी यांनी सांगितलं. जीवनाचा खरा हेतू सेवा आणि परोपकार असतो, असं सांगून मोदी म्हणाले.....

***साथियों, हमारा शरीर परोपकार के लिए ही है, सेवा के लिए ही है। और जब ये सेवा संस्कारों में आ जाती है, तो सेवा ही साधना बन जाती है। यही साधना तो हर एक स्वयंसेवक के जीवन की प्राण वायु होती है।***

सरकारच्या सर्व धोरणांमध्ये आणि निर्णयांमध्ये राष्ट्र प्रथम ही भावना असून, देश आता गुलामगिरीची मानसिकता सोडून देत पुढे वाटचाल करत असल्याचं त्यांनी सांगितलं, ते म्हणाले....

***गुलामी की सोच से बनी दंड संहिता की जगह अब भारतीय न्याय संहिता लागू हुई है। हमारे लोकतन्त्र के प्रांगण में अब राजपथ नहीं, कर्तव्यपथ है। हमारी नौसेना के ध्वज में भी गुलामी का चिन्ह छपा हुआ था, उसकी जगह अब नौसेना के ध्वज पर छत्रपति शिवाजी महाराज का प्रतीक लहरा रहा है। अंडमान के द्वीप, जहां वीर सावरकर ने राष्ट्र के लिए यातनाएँ सहीं, जहां नेताजी सुभाष बाबू ने आज़ादी का बिगुल फूंका, उन द्वीपों के नाम भी अब आज़ादी के नायकों की याद में रखे गए हैं।***

दृष्टीहिनांच्या जीवनात प्रकाश आणण्याचं काम करत असलेलं माधव नेत्रालय; हे केवळ महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण मध्य भारतासाठी उपयुक्त ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर माधव नेत्रालय लोककल्याणाच्या प्रेरणेनं अव्याहतपणे कार्यरत असल्याचं सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

त्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपूरमधील रेशीमबाग इथल्या स्मृती मंदिराला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृतीस्थळांना पंतप्रधानांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर दीक्षाभूमीवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावर जाऊन मोदी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली. नागपूर अमरावती रस्त्यावरल्या बाजारगाव इथल्या सोलर एक्सप्लोजिव्ह टेस्ट रेंज आणि रन वे सुविधेचं उद्घाटनही काल मोदी यांच्या हस्ते झालं.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा एकशे विसावा भाग होता. महाराष्ट्रातल्या गुढी पाडव्यासह, देशभरात विविध ठिकाणी येत्या काही दिवसात, नववर्षाच्या स्वागतासाठी साजऱ्या होणाऱ्या रोंगाली बिहू, पोईला बोइशाख, नवरेह सणाच्या, तसंच ईदच्याही शुभेच्छा त्यांनी दिल्या. कालच्या मन की बातमध्ये पंतप्रधानांनी टेक्स्टाईल वेस्ट म्हणजेच कपड्यांपासून निर्माण होत असलेल्या कचऱ्यांच्या नव्या आव्हानाविषयी माहिती दिली. ते म्हणाले.....

***भारत दुनिया का तीसरा ऐसा देश है, जहां सबसे ज्यादा Textile Waste निकलता है। यानि चुनौती हमारे सामने भी बहुत बड़ी है। लेकिन मुझे खुशी है कि हमारे देश में इस चुनौती से निपटने के लिए कई सराहनीय प्रयास किये जा रहे हैं। कई भारतीय Start-Ups ने Textile Recovery Facilities पर काम शुरू किया है। कई ऐसी टीमें हैं, जो कचरा बीनने वाले हमारे भाई-बहनों के सशक्तिकरण के लिए भी काम कर रही हैं। कई युवा-साथी Sustainable Fashion के प्रयासों में जुड़े हैं। वे पुराने कपड़ों और जूते-चप्पलों को Recycle कर जरूरतमंदों तक पहुंचाते हैं।***

परीक्षा संपून लागलेल्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गानं नवी कौशल्ये शिकावीत, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी जल संवर्धनावरही भर दिला. तसंच  यानिमित्तानं कॅच द रेन या मोहीमेची माहिती दिली. खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीची मोदी यांनी प्रशंसा केली.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. आज संध्याकाळी त्यांचं मुंबईत आगमन होईल; त्यानंतर उद्या, भारतीय रिझर्व बँकेच्या नव्वदाव्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमाला त्या उपस्थित राहणार आहेत.

**<u>गुढीपाडवा</u>**

नववर्ष प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचा सण काल संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा करण्यात आला. घरोघरी रेशमी वस्त्र, कडुनिंब आणि साखरेच्या गाठ्यांच्या माळांनी सजवलेली गुढी उभारून, तिची पूजा करण्यात आली. साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या या मुहूर्तावर घर, वाहन खरेदीसह नवीन उद्योग व्यवसायाचा प्रारंभ करण्यात आला. गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर गेल्या 7 दिवसात राज्यात मोठ्या प्रमाणावर; म्हणजे 86 हजार 814 नवीन वाहन खरेदीची नोंदणी करण्यात आली. या दिवशी वासंतिक नवरात्राचाही प्रारंभ होतो; नाशिकच्या श्री काळाराम मंदिरात तसंच नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माहूर इथं रेणुका देवीच्या चैत्र नवरात्रोत्सवाला काल उत्साहात प्रारंभ झाला. पुण्यतल्या तुळशीबाग राममंदिरासह विविध राममंदिरात राम नवमीच्या कार्यक्रमांची सुरुवात कालपासून झाली. याबरोबरच गुढी पाडव्याच्या दिवशी राज्यभरात अनेक सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांची रेलचेलही पाहायला मिळाली. पुण्यात जनसेवा न्यासानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात पाच हजार महिलांनी दुचाकी फेरी काढत 100 कोटी लिटर पाणी बचतीचा संकल्प केला. रायगडमधील पेणमध्ये अंकुर ट्रस्ट आणि महिला अत्याचार विरोधी

मंचाच्या वतीने स्त्री अस्मितेची आणि संविधानाची गुढी उभारण्यात आली. यात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. नववर्षाच्या स्वागतासाठी ठाणे, रत्नागिरी, अहिल्यानगरसह राज्यभरात अनेक ठिकाणी काल स्वागत यात्रा काढण्यात आल्या; यात नाटक चित्रपट क्षेत्रातील कलाकार, तसंच राजकीय नेत्यांनीही भाग घेतला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पाडवा मेळावाही काल मुंबईत पार पडला. या वेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील विविध शहरांमध्ये होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबरोबरच राज्यातील विविध विषयांवर भाष्य केलं.

**ईद**

देशभरात आज ईद-उल-फित्रचा उत्साह आहे. मुस्लीम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्याची सांगता ईदच्या दिवशी होते. रमजान ईदनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**नक्षलवादी-गडचिरोली**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यातल्या 50 माओवाद्यांनी काल पोलिसांसमोर शरणागती पत्करली. यात प्रत्येकी 68 लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या 14 नक्षलवाद्यांचा समावेश असल्याचं पोलिसांनी सांगितलं. सैन्य आणि प्रशासनानं दुर्गम खेड्यात केलेल्या सुविधांमुळे प्रभावित होऊन या नक्षलींनी आत्मसर्पण केल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

दरम्यान, छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात माओवाद्यांनी पेरलेल्या स्फोटकांचा स्फोट होऊन एका आदिवासी महिलेचा काल मृत्यू झाला. तर गडचिरोली जिल्ह्यात जुव्वी गावातील एका व्यक्तीची नक्षलवाद्यांनी शनिवारी रात्री हत्या केली. गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनरायजर्स हैदराबादवर 7 गडी आणि 24 चेंडू राखून विजय मिळवला. तर राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांदरम्यान झालेल्या रोमहर्षक सामन्यात राजस्थान रॉयल्सनं विजय मिळवला. रियान परागच्या नेतृत्वाखालील राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्सचा अवघ्या 6 धावांनी पराभव केला.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी तापमानाचा पारा वाढत असून काल सर्वात जास्त कमाल तापमानची नोंद चंद्रपूर इथ 42 अंश सेल्सिअस इतकी झाली. येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.